# वर्धा जिल्हा क्राईम

**पोलीस स्टेशन हिंगणघाट येथे मारहाणीचा गुन्हा नोंद**

फिर्यादी संजय मोतीराम लांडगे वय ३८ वर्ष, जात तेली व्यवसाय शेती रा तरोडा ता समुद्रपुर जि.वर्धा हा चे सुमारास वडीलांसह जेवण करीत असतांना घराशेजारी राहणारा गोपाल कारवटकर हा माझ्या घरासमोर आला व तुमचा ट्रॅक्टर तुम्ही तुमचे घरासमोर का उभा करता असे म्हणून जोरजोराने ओरडुन शिवीगाळ करीत असतांना माझी घरासमोर आला व आईने त्याला तु घरासमोर शिवीगाळ का करते असे बोलली असता त्याने मला शिवीगाळ करीत असतांना ट्रॅक्टर उभा करण्याबददल बोललो असतांना तु माझे मधात का बोलली. या कारणावरून माझे आई सौ अजनाबाई लांडगे हिचे डोक्याचे केस पकडून ओढतान करीत असताना मी व माझे वडील मोतीराम लांडगे सोडविण्यास गेलो असता गोपाल कारवटकर याने त्याने जवळील चाकुने माझे कपाळावर उजवे हाताच्या दंडाजवळ व डावे हाताच्या अंगठ्याला व तसेच माझे वडील मोतीराम लोडगे हे सोडविण्यास आले असता त्याच्या तळहातावर चाकु मारून त्यांना सुद्धा जखमी केले. अशा फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा नोंद करून तपासात घेतला.

**पोलीस स्टेशन आर्वी येथे मारहाणीचा गुन्हा नोंद**

फिर्यादी मी पियुष अशोकराव भुरके वय १७ वर्ष, जात कुणबी रा. नेताजी वार्ड तह, आर्वी जि. वर्धा व माझे मित्र दुर्गेश वाघमारे, करण सुधाने यश मेंद्रे व आयुष डोके असे गोकुपाम सोसायटी कोर्टाने मागे क्रिकेट खेळत होतो. क्रिकेट खेळण झाल्यावर आम्ही घराकडे जात असताना अमर इरपाचे व दुसरयाचे भांडन सुरु होते आम्ही ते पाहण्यास गेलो असता मला अमर इरपाचे याने त्याच्या हाताने डाव्या डोक्यावर हातातील कडे मारले त्यामुळे मला डाव्या डोक्यावर जखम झाली व रक्त निघत आहे. अश्या फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट व मेडीकल सर्टिफिकेट वरून सदरचा गुन्हा नोंद करून तपासात घेतला.

**पोलीस स्टेशन आष्टी येथे मारहाणीचा गुन्हा नोंद**

फिर्यादी अंकुश महादेवराव कोहळे वय ३० वर्ष धंदा- शेती जात कुणबा रा. खबीत ता. आष्टी जि. वर्धा समक्ष पोलीस स्टेशनला येवुन तोंड रिपोर्ट दीली कि, वरील पत्यावर वडील महादेवराव विठोबाजी कोहळे यांचेसह राहतो. व शेतीकाम करून आपला व आपल्या वडीलाचा उदनिर्वाह करतो. फिर्यादीला एक मोठा भाऊ सुदर्शन महादेवराव कोहळे हा असुन त्याचे लग्न झाले असुन तो त्याचे कुटूंबासह वर्षापासून नेर जि. अमरावती येथे राहतो. माझे वडीलांचे नावे साडे तीन एकर शेती असुन त्यापैकि दिड एकर शेती त्यांनी माझी नावाने केली होती. त्याबाबत मी माज्या मोठ्य भावाची सही नेर येथे आज दि. १७.०७.२००३ रोजी त्याचे घरी गेलो होतो. त्याने मला सही देत नाही असे म्हटले असता, मी परत माझे गांवी खंबीत येथे आलो आज दि. १७.०७.२०१३ रोजी सायंकाळी ०६.००वा दरम्यान मी माझे घरासमोर उभा असताना माझा मोठा भाऊ ना सुदर्शन महादेव कोहळे हा माझेजवळ आला व मला म्हणाला कि तु माझ्या घरी कशाला आला होता. मी तुला सही देत नाही. तेव्हा मी त्याला म्हटले कि शेत माझे नावे करने आहे. तु मला शेतीच्या कागदपत्रावर सही दे. तेंव्हा त्याने माझेशी शेतीच्या कागदपत्रावर सही देण्याचे कारणावरून मला शिवीगाळ करून त्याचे जवळ असलेल्या चाकुने माझे डावे हाताचे दंडावर मारून जखमी केले त्यामुळे रक्त निघून दुखत होते. त्यावेळी आमचे भांडण पाहुन माझे वडील महादेवराव कोहळे हे आमचे मधात आले व भांडण सोडविले. त्यानंतर मी पोलीस स्टेशन आष्टी येथे त्याचे विरुद्ध रिपोर्ट देण्यास आलो आहे. अशा फिर्यादी याचे तोडी रिपोर्ट, मेडीकल सर्टीफिकेटवरून सदरचा गुन्हा नोंद करून तपासात घेतला.

**पोलीस स्टेशन सावंगी फसवणुकीचा गुन्हा नोंद**

फिर्यादी माणिक मुकुंदाजी हरले, वय ७० वर्षे, जात बौद व्यवसाय सेवानिवृत्त, रा. व्यकटेश नगरी अग्निहोत्री कॉलेज जवळ, नागठाणा रोड, ता. जि.वर्धा से मौजा नागठाणा रोडने व्यंकटेश नगरी जवळ वॉकिंग करीत असताना दोन अज्ञात इसम मोटार सायकलवर आले व हम पोलीस हैं। वर्मा के घर मे दरोडा और मारपीट हुई है। हमे यहां बड़े साहब ने इन्क्वायरी के लिए भेजा हैं ' ऐसा सोना पहेन के नहीं घुमने का कोई खिच लेगा हाथ से असे म्हणून फिर्यादी याने हातातील ५ ग्रॅम सोन्याची अंगठी अंदाजे किंमत २५,०००/- रु ची काढून कागदी पुढीत बांधली तसेच फिर्यादीची नजर चुकवून फिर्यादीला त्याचे जागी वेगळयाच पाच पिवळी अंगठी कागदी पुडीत बांधुन दोन्ही अज्ञात आरोपीतांनी फिर्यादीची फसवणुक केली अशा फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा नोंद करून तपासात घेतला.

**पोलीस स्टेशन रामनगर महाराष्ट्र पोलीस कायदा गुन्हा नोंद**

रामनगर परिसरात अवैध धंदयावर कार्यवाही करणे करिता तसेच परिसरातील पाहिजे आरोपी व तडीपार इसम यांचा शोध घेणे संबंधाने मा पोलीस निरीक्षक सा पोलीस स्टेषन रामनगर यांचे आदेशान्वये कर्तव्य लागले असल्याने त्या संबंधाने कार्यवाह करणे असल्याने आम्ही पंच यांना सदर बाबत सुचनापत्र देवून सोवत चलण्याचे बाबत दिनती करून वरील पंच व पोस्टाफ पोक १६८७ ५८ १५३६ यांचे सह खाजगी वाहनाने रवाना होवुन सिंदी मे वर्धा येथील परीसरात पेट्रोलिंग करीत असतांना पोलीस स्टेपन रामनगर येथील हरीत राहणारा तडीपार गुन्हेगार नामै संकेत सुनिल हमारे वय २४ वर्ष रा. सिंदी मेघे वर्धा हा मिळुन आल्याने सदर तडीपार इसम हा उपविभागीय अधीकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी वर्षा उपविभाग कार्यालय वर्षा यांचे आदेष क्र. प्रकरण क्र. ०३/ २०२२ अन्वये मोका १९५१ चे कलम ५६ (२) (ब) अन्वये दिनांक ०७/०२/२०२३ अन्वये वर्धा जिल्हा व जिल्हया लगतचे जिल्हयातुन ०.२ वर्षा करीता हडपार असुन सुध्दा वर्षा जिल्हयातील पोलीस स्टेपन रामनगर हद्दीतील अधीकार क्षेत्रातील सिदी मेत्रे येथे मिळुन आल्याने त्यास कोणत्या सक्षम अधीकारी याची वहां जिल्हयातील स्थलसमेत येण्याची परवानगी घेतली आहे किंवा कसे या बाबत विचारणा केली असता त्याने कुठल्याहि प्रकारची परवानगी नसल्याचे सांगीतले वरून सदर हरपार इसम नामेसंकेत सूनिल हमारे वय २४ वर्श रा सिंदी मे वर्धा यास ताब्यात घेण्याचे पंचनामा कार्यवाहि करून ताब्यात घेवून सदर पार ईसम नामे संकेत सूनिल डंभारे वय २४ वर्श रा. सिंदी मेघे व याने कलम १४२ मोका अन्वये गुन्हा केला असल्याने त्याचे वर गुन्हा नोंद करून तपासात घेतला.

**पोलीस स्टेशन हिंगणघाट भारतीय हत्यार कायदा अन्वये गुन्हा नोंद**

फिर्यादी डायल ११२ डयूटीवर असताना एक इसम अनिकेत प्रमोद भोयर वय २४ रा. इंदिरा गांधी वार्ड हिंगनघाट जि. वर्धा हा आपले हातात लोखंडी तलवार कि. २०० रूपेवून तुषार रामदास भोयर याचे भरा जवळ इंदिरा गांधी बाई हिंगनघाट येणारे जाणारे लोकाना शिवीगाळ करून दहशत पसरवितअसताना दिसला त्यास पोस्टें से स्टॉप चे दोन व पंचाचे मदतीने त्यास ताब्यात घेवून सदरचा गुन्हा नोंद करून तपासात घेतला.

**पोलीस स्टेशन समुद्रपुर येथे अकस्मात मृत्यु**

हकिकत या प्रमाणे आहे की यातिल मृतक सोनल विनोदराव सावरकर वय १७ वर्षे रा गजानन नगरी वार्ड क ०२ समुद्रपुर हि दि.१५/०७/२०२३ चे ११/०० वा. दरम्यान स्वताचे राहते घरी विषारी औषध प्राशन केल्याने तिला उपचारा करीता आ वि भा.ग्रा. रूग्णालय सावगी (मेघे) येथे भरति केले असता उपचार दरम्याण मरण पावल्याने पोलीस स्टेशन सावंगी मेमे येथे स्टेडा सान्हा कमाक ०१ / २०२३ येथे कलम २७४ जा. फौ. प्रमाणे मग नोंद करण्यात आला.

# सिंदी (मेघे) वार्ड क्र.४ येथील रहिवाशांचा रस्ता बंद करून अवैधरित्या अतिक्रमण

**साहसिक वृत्त / १९ जुलै**

**वर्धा :** मौजा सिंदी (मेघे) वार्ड क्र.४ न्यु. रेल्वे कॉलनी येथील रहिवाशांचा येण्या-जाण्याचा रस्ता बंद करून अवैधरित्या चरणदास खेरकार यांनी अतिक्रमण करून घराचे बांधकाम सुरू केले. या संदर्भात अर्जदार जीवन साटोणे, जयवंत निखार यांनी तक्रारी सुध्दा प्रशासन दरबारी दाखल केल्या. परंतु, अजुनही चरणदास महादेवराव खैरकार यांचे बांधकाम सुरूच आहे. या संदर्भात प्रशासनाने दखल घ्यावी व न्याय मिळावा, अशी मागणी जीवन साटोणे, जयवंत निखार यांनी केली आहे. अन्यथा जिल्हा परिषद समोर आमरण उपोषणाचा ईशारा सुध्दा देण्यात आला आहे.

मौजा सिदी (मेघे) येथील शेत सर्वे नं.१०३/१ क १०३/२ नवीन २४८ या प्लॉटमधील प्लॉट क्र.३८ च्या पूर्व दिशेला लेआऊटमधील अर्जदार जीवन झिलबाजी साटोणे, जयवंत विठ्ठलराव निखार यांच्या मालकीची १० फूट जागा असून विक्रीपत्रानुसार पुर्वेस आमरस्ता सुध्दा आहे. या मुख्य रस्त्यावर गैरअर्जदार चरणदास महादेवराव खैरकार यांनी आधी पक्की भिंत बांधली. त्यामुळे रहिवाशांचा येण्या-जाण्याचा रस्ता बंद झाला. सदर रहिवाशी गेल्या ४० वर्षापासून येथे राहत असून त्याच जागेवरून त्यांचे येणे जाणे सुरू आहे. या आम रस्त्यावर गैरअर्जदार चरणदास महादेवराव खेरकार यांनी अतिक्रमण करून अवैधरित्या पक्क्या सिमेंट विटाच्या भिंतीचे बांधकाम करून तेथील रहिवाशांचा येण्या जाण्याचा रस्ता बंद केला आहे. महसूल अधिनियम कायद्यानुसार कुणाचाही रस्ता बंद करणे हा फोजदारी गुन्हा आहे. त्या उपरही त्यांनी हा उपद्व्याप सुरू केला. या संदर्भात अर्जदार जीवन साटोणे, जयवंत निखार यांनी जिल्हाधिकारी, जि.प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी,



तहसिलदार, गटविकास अधिकारी पंचायत समिती, सरपंच व सचिव ग्रा.पं. सिंदी (मेघे) येथे तक्रारी सुध्दा दाखल केल्या आहेत. परंतु, अद्यापही या संदर्भात कोणतीच कारवाई झालेली नाही. या संदर्भात दि. २५ मार्च २०२३ रोजी खेरकार यांना कोणतेही बांधकाम किंवा कंपाउंड करतेवेळी ग्रा.पं.ची रितसर बांधकाम परवानगी घ्यावी. आपण परवानगी न घेता रहिवाशांच्या घराचा रस्ता बाधित होत असल्याचे तक्रारीमुळे कोणतेही बांधकाम करतेवेळी ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम नुसार रितसर परवानगी घेऊनच काम करावे. अन्यथा कायदेशीर कारवाई करण्यात येईल व केलेले बांधकाम सुध्दा तोडण्यात येईल, असे पत्र ग्राम पंचायत सिंदी मेघे यांनी खैरकार यांना दिले आहे. या पत्राच्या प्रती तहसिलदार व ठाणेदार रामनगर पो.स्टे. ला सुध्दा सादर करण्यात आल्या. परंतु, अद्यापही कोणतीच कारवाई करण्यात आलेली नाही. या संदर्भात ग्रा.पं.ने चरणदास खैरकार यांना ३ एप्रिल २०२३ रोजी घर बांधकाम परवानगीबाबत पत्र दिले होते. परंतु त्यांनी बांधकाम परवानगीची प्रत सादर केलेली नाही. तसेच बांधकाम परवानगीसाठी विहित कागदपत्रे सुध्दा सादर करा, असे सुध्दा पत्र दिले. तरीही मुजोरपणे चरणदास खेरकार आपले अवैधरित्या अतिक्रमित जागेत बांधकाम करीतच आहे.

दि. २४ एप्रिल रोजी तहसिलदार रमेश कोळपे यांनी जिल्हा पोलिस अधिक्षक वर्धा यांना पत्राव्दारे कळविले की, विषयांकित सिंदी (मेघे) येथील सर्वे नं.१०३ / १ क १०३ /२ नवीन २४८ या प्लॉटमधील प्लॉट क्र. ३८ चे पूर्व दिशेवरील रस्त्यावर अवैध बांधकाम करीत असल्याने ते मोकळे करण्याकरिता पोलिस बंदोबस्त मिळावा. कारण अर्जदार जीवन झिबलाजी साटोणे, जयवंत विठ्ठलराव निखार यांनी दि. ३ एप्रिल रोजी या संदर्भात पत्र दिले होते की, चरणदास महादेवराव खैरकार वार्ड नं. ४ सिंदी (मेघे) यांनी शेत सर्वे क्रमांक २४८ मधील प्लॉट क्र. ३८ वर त्यांचे घर आहे. त्यांच्या घराचे बाजुला रस्ता असून सदर रहिवासी आमरस्त्यावर चरणदास महादेवराव खैरकार यांनी अतिक्रमण करून व अवैध बांधकाम करून जाण्यायेण्याचा रस्ता बंद केलेला आहे. सदर प्रकरण न्याय प्रविष्ठ आहे. तरी या संदर्भात अवैध बांधकाम थांबविण्यासाठी पोलिस बंदोबस्ताची आवश्यकता असल्याने ते मिळावे. अशा आशयाचे विनंती पत्र तहसिलदार रमेश कोळपे यांनी दिले होते. सदर प्रत रामनगर पो.स्टे. ठाणेदारांना सुध्दा दिली आहे. तरी सुध्दा चरणदास खैरकार याचे अतिक्रमित बांधकाम सुरूच आहे. या संदर्भात प्रशासनाने योग्य दखल न घेतल्यास जिल्हा परिषदच्या आवारात आमरण उपोषणाचा ईशारा जीवन साटोणे व जयवंत निखार यांच्या परिवाराने दिला आहे.

# केशव सिटी, माधव सिटी व वृंदावन नगरातील नागरिक आक्रमक
## १५ दिवसात समस्या निकाली काढा अन्यथा आंदोलन




**साहसिक वृत्त / १९ जुलै**

**वर्धा :** शहरालगतच्या मौजा सिदी (मेघे) ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या केशव सिटी. माधव सिटी व वृंदावन नगरातील नागरिक विविध समस्यांच्या विळख्यात सापडले आहेत. वेळोवेळी निवेदन देऊन सुद्धा ग्रामपंचायत प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याने आक्रमक झालेल्या नागरीकांनी १५ दिवसात समस्यांची पुर्तता करा अन्यथा आंदोलन करण्याचा ईशारा निवेदनातून दिला आहे. दोन्ही भागात सांडपाण्याची व्यवस्था न लावल्याने रहदारीचच्या रस्त्यावर पावसाचे पाणी वाहत असून चिखलाचे साम्राज्य आहे . तसेच वृंदावन नगर येथून जाणारा मुख्य रस्ता ग्रामपंचायत हद्दीतील असून प्रचंड दैनावस्था झाली आहे. अशावेळी नागरीकांना कमालीचा त्रास सहन करावा लागत असून त्रस्त आहे. या रस्त्याने रेती व मुरूमाने भरलेले ट्रक. नेहमी धावतात त्यामुळे रस्त्याची आणखीन च वाट लागून दुरवस्था झाली. पावसाळ्यात नागरीकांना रोजनिशी चालने व वाहन चालवणे कठीण झाले आहे. विशेष म्हणजे याच मार्गाने शाळकरी विदयार्थी दररोज आवागमन करीत असते. त्यामुळे अपघात होण्याची शक्यता बळावली आहे. माधव सिटी व केशव सिटीला लागुनच कचरा डेपो असल्याने परीसरात दुर्गंधी पसरली असून येथील नागरीकांचे आरोग्य धोक्यात आहे. नागरीकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे.

या तिन्ही समस्या बाबत ग्रामपचायत प्रशासनाकडे वारंवार पाठपुरावा करने सुरू आहे. स्थानिक नागरीकांच्या ह्या समस्या सबंधित लोकप्रतिनिधींना सांगूनअवगत करण्यात आले परंतु कुणीही लक्ष देण्यास तयार नाही. त्यामुळे आता दाद मागायची तरी कुणाला? असा प्रश्न येथील नागरिकांना उपस्थित झाला. येत्या १५ दिवसात समस्या निकाली काढाव्यात अन्यथा आंदोलन करण्याचा ईशारा निवेदनातून दिला आहे. निवेदन देते वेळी श्रद्धा लांडगे. अमित गायकवाड. विशाल हिवरकर. सारिका राहाटे.डॉ.आंबटकर, संगिता धामंडे.शिवाजी चौधरी. सुनील वासनिक. राजेश वाकडे डॉ, वंजारी. चिरूदत्त बोडखे. राम पोहनकर यांची उपस्थीती होती.

# वन्यप्राण्यांचा बंदोबस्त करा; शेतकरी अस्त
## जिल्हाधिकारी व उपवनसंरक्षक यांना शेतकऱ्यांनी दिले निवेदन



**साहसिक वृत्त / १९ जुलै**

**वर्धा :** मौजा येसंबा ता.वर्धा येथील शेतकऱ्यांना रोही(नीलगाय) जनावरांपासून मागील १०-१२ वर्षापासून होत असलेल्या त्रासाबद्दल येसंबा येथील शेतकऱ्यांनी बरेच वेळ निवेदन दिले व आज दि. १७ जुलै २०२३ ला सुद्धा निवेदन देण्यात आले, आम्ही सर्व शेतकऱ्यांनी गेल्या मार्च महिन्यात सुद्धा मा. उपवनरक्षक श्री. शेपट साहेब यांना निवेदन दिले होते पण त्यांनी त्यावर कोणत्याही प्रकारची कार्यवाही केलेली नाही. या वर्षी खरीप हंगाम सुरू झाल्यापासून पुन्हा आम्हाला नीलगाय (रोही) वराह यांचा मोठ्या प्रमाणात त्रास वाढला असून शेती पिकाचे अतोनात नुकसान होत आहे.आणि यामुळे रात्री बेरात्री आम्हाला जीवावर उद्धार होऊन कुटुंब घरी सोडून शेतामध्ये जावे लागते, आणि त्यांनी खूप मोठ्या प्रमाणात नुकसान सुद्धा आमचे केले आहेत, या नुकसानीला कंटाळून आज आम्ही सर्व शेतकरी जिल्हाधिकारी कार्यालय वर्धा व उपवनरक्षक कार्यालय वर्धा, यांना निवेदन दिले, व यावर तातडीने उपाय योजना करावी असे त्यांना निवेदनाद्वारे सांगितले. रोजनिशी शेती पिकाचे नुकसान अशामुळे आम्ही हवालदिल होवू आमचे उपासमारीचे दिवस यायला वेळ लागणार नाही. असे त्यांना निवेदनातून कळविले, आणि आम्हाला शेती शिवाय दुसरा पर्याय नाही, आमच्या शेतात जर काही पिकले नाही तर आम्हाला उपाशी मरण्या शिवाय पर्याय नाही. आणि वनविभाग यावर बघ्यांची भुमिका घेऊन काहीही करायला तयार नाही.शेतकऱ्यांचा वाली व्हायला कुणीही तयार नाही असेच वाटते आहे.

नेहमी करीता रोजी जंगली जनावर ह्यांचा त्रास शेतकरी होणार नाही, ह्यांची उपाययोजना करावी. विषयाला गांभीर्याने विचार करून आम्हा शेतकऱ्यांना सहकार्य करावे. यावेळी भारतीय जनता पक्षाचे वर्धा जिल्हाध्यक्ष श्री. सुनील गफाट, गावातील सरपंच श्री सत्यवान भगत, समाजसेवक श्री. भय्यासाहेब हिवंज,तंटा मुक्ती अधक्ष्य श्री, अशोक बुरांडे, श्री.महेशभाऊ देवढे, प्रभुजी भोयर, विठ्ठल चौधरी, शुभम शेंडे, महादेव चावरे, किसनराव चौधरी आदी शेतकरी उपस्थित होते.

# नगरपरिषद अंतर्गत निकृष्ट दर्जाची विकासाची कामे सुरुच






**साहसिक वृत्त / १९ जुलै**

*** केदार लेआउट मध्ये अंदाजपत्रकानुसार होत नाही रस्त्याचे काम**
*** नागरिकांनी दिली मुख्य अधिकाऱ्याला लेखी तक्रार**

**देवळी :** देवळी शहरामध्ये केदार लेआउट मधील प्रशांत चहारे ते लाडेकर यांच्या घरापर्यंत होणाऱ्या रस्त्याचे बांधकाम अंदाजपत्रकानुसार होत नसून निकृष्ट दर्जाचे बांधकाम होत आहे.सुरू असलेल्या रस्त्याचे बांधकाम दिलेले अंदाजपत्रकानुसार होत नसून अंदाजपत्रकामध्ये हार्ड मुरूम,सॉफ्ट मुरूम,चा उल्लेख असतांना निकृष्ट अशा डस्ट सर्रास वापर सुरू आहे. सध्या रस्ता बांधकामाच्या सुरुवातीला संबंधित ठेकेदार अंदाजपत्रकातील कामे डवलून मन मर्जीने काम करीत आहे.

हे सर्व निकृष्ट दर्जाचे काम सुरू असताना

(उर्वरित पान २ वर)

# महिलेसर शिवीगाळ प्रकरणी गुन्हा दाखल

**साहसिक वृत्त / १९ जुलै**

**देवळी :** वडिलोपार्जित शेती करणारी विधवा महिला राजश्री निळकंठ झाडे रा. नांदोरा हल्ली मुक्काम नगरपरिषद लेआउट देवळी हे आपल्या पतीच्या निधनानंतर देवळी तालुक्यातील नांदोरा गाव येथील आपली शेती करीत आहे परंतु काही दिवसापासून त्या गावातील एक परिवार त्या महिलेस आपली वडिलोपार्जित शेती करण्यास रोखत आहे ही शेती आमची आहे तू या शेतात आली तर तुला जीवाशी मारू व अश्लील भाषेत शिवीगाळ करून त्या महिलेस शेतातून हाकलून हाकलून लाविले आपला जीव मुठीत घेऊन तिने सरळ देवळी पोलीस स्टेशन गाठले व आपल्या जवळील असलेले शेतीचे सर्व कागदपत्रे पोलिसांना दाखविले व माझ्या शेतात मलाच येऊ देत नाही अश्लील शिवीगाळ करून मला जीवेस मारण्याची धमकी देतात यापूर्वीही या महिलेने या लोकांकडून माझ्या जीवास धोका आहे अशी तक्रार दिली होती आताही माझ्या जीवास धोका आहे असे असे पोलिसांना सांगून तक्रार नोंदविली. देवळी पोलिसांनी गैरअर्जदार घनश्याम जामनकर,भाऊराव जामकर,सीमा घनश्याम जामनकर यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे पुढील तपास देवळी पोलीस करीत आहे.

# मार्बल मार्केट मध्ये चालणाऱ्या ओवरलोड ट्रकांवर कार्यवाही करण्याची मागणी



**साहसिक वृत्त / १९ जुलै**

**नागपुरः** शहर महानगर विदर्भ गंगाबाई घाट परिसरात पूर्व नागपुर शहर विधानसभा शेत्र वर्धमान नगर भंडारा रोड येथींल मार्बल मार्केट मध्ये चालणारे ट्रक हे पूर्णक ओवर लोड होऊन चालतात. गंगाबाई घाट परिसर ते वर्धमान नगर चौक पूर्व नागपुर शहर हा रस्ता व्यस्त असून या रस्त्यावर ओवर लोड ट्रक मूळे कित्येक अपघात होऊन लोक मृत पावले आहेत तसेच दररोज अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही व रस्त्याचे होणारे नूकसान पाहता शहरात कूठेही बेमुंदत्त ओवर लोड ट्रक मुळातच दिसायला नकोच पण तरीही गंगाबाई घाट परीसरात येथील मार्बल मार्केट मध्ये प्रामुख्याने अनलिमींटेड ओवर लोड आढळतात.

याकडे आपण ताबडतोब विशेष लक्ष देऊन हि मागणी निकाली काढावी अन्यथा पूढे काही अनुचित प्रकार घडला तर विदर्भ राज्य आंदोलन समिती, व युवा टायगर फोर्स, जय विदर्भ पार्टी, भारत राष्ट्र समिति, आम आदमी पार्टी, तारेश दुरुगकर बहुद्देशीय संस्था,अखिल भारतीय ओबीसी बहुजन महासंघ, तर्फे तीर्व आंदोलन करण्यात येईल असा इशारा कंट्टर विदर्भ वादी कार्यकर्ता यांनी निवेदनाद्वारे दिला आहे. प्रदेशिक परिवहन अधिकारी साहेब, व जिल्हा अधिकारी साहेब, व पोलिस आयुक्त नागपुर शहर महानगर निवेदन यांचा उपस्थिति त्त दन्यात आले, विदर्भ वादि कार्यकर्ता श्री. पराग अविनाश वैरागडे नागपुर जिल्हा अध्यक्ष, युवा टायगर फोर्स, श्री.अमूल साकूरे नागपुर जिल्हा अध्यक्ष, वाहतूक आघाडी जय विदर्भ पार्टी, श्री. राजेन्द्र सतई नागपुर शहर महासचिव, वि .रा.आ.स. मा.श्री. तारेश गजानन दुरुगकर कंट्टर विदर्भ वादी नेते पूर्व नागपुर शहर विधानसभा शेत्र प्रभाग क्रमांक २४. तारेश दुरुगकर बहुद्देशीय संस्था, संस्थापक अध्यक्ष महोदय, बळीसत्ता संपादक साहेब, लोकजागृतीक विशेष प्रनिनीधी नागपुर शहर महानगर व नागपुर जिल्हा तथा शेर ए हिन्दुस्तान दैनिक पेपर न्यूज चाईनल रीपोटर, मो.८३२९७१२९८६, डॉ. प्रवेश भूवन टेभेंकर गौंदिया जिल्हा भ्ऊश, रितीक दिलीप गायकी दक्षिण नागपुर शहर यूवा अध्यक्ष, युवा आघाडी, श्री. रविंद्र रामचंद्र कुथे आम आदमी पार्टी,सोनेगाव, श्रीमती.आरती ताई चौव्हाण शेर ए हिन्दुस्तान दैनिक पेपर न्यूज चाईनल रीपोटर नागपुर शहर महानगर, श्रीमती. आरती ताई उत्माल, श्रीमती कोमल ताई दुरुगकर,श्रीमती. नंदिनी ताई देशमुख,श्रीमती. मिना ताई राव,शुभांगी शिंगाडे, भंडारा जिला, गुंफा येमुलवार यवतमाळ जिला, श्री.गजानन फट्टींग, श्री. मधुसूदन सपकाळ, श्री. भरतकूमार देशपांडे, श्री. सुबेदार, गुणवंत सोमकुवर नागपुर शहर उपाध्यक्ष जय विदर्भ पार्टी जय विदर्भ ईत्यादी विदर्भ वादि कार्यकर्ता उपस्थित्त होते.

दै.साहसिक हे वृत्तपत्र मालक, प्रकाशक,संपादक रवींद्र नरहरिपंत कोटंबकार,मुद्रक-निरज त्रिपाठी यांनी जनसंग्राम ऑफसेट प्रिंटर्स, आर.टी.रोड गोंडप्लॉट वर्धा येथे मुद्रित करून दै.साहसिक कार्यालय, राधे कॉम्प्लेक्स, अकोला अर्बन बँकेच्यावर, सोशालिस्ट चौक, वर्धा येथे प्रकाशित केले.
दूरध्वनी: (07152) 242498, dsahasik@gmail.com RNI NO. MAHMAR / 2007 / 24829 - Postage- WDA / 42 / 08 -10 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.(कुठलाही वाद वर्धा न्यायालयांतर्गत बाध्य राहील.)